प्रभात पुणे
मंगळवार, दि. ४ फेब्रुवारी २०१४

# विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धन धडे

## 'सिटी ऑफ द बर्डस्' चा जेजुरीमधील शाळांत उपक्रम

**जेजुरी, दि. ३ (वार्ताहर)** - सिटी ऑफ द बर्डस कॉंझरवेशन अँड रिसर्च आणि विश्वनिर्मल विद्यामंदिर जेजुरी यांच्या वतीने ग्रामीण भागातील मुलांमध्ये शास्त्रीय दृष्टिकोन, पर्यावरण संवर्धन व संशोधक वृत्ती निर्माण व्हावी यासाठी दोन दिवसांची कार्यशाळा यशस्वीपणे झाली असल्याचे आयोजक चंद्रकांत एडिकन यांनी सांगितले.

जेजुरी येथील विश्वनिर्मल विद्यालयात पर्यावरणाचे संवर्धन व प्रत्यक्ष कृती संशोधनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी लोणी काळभोर, कोथळे, जिजामाता, पुण्यश्लोक व विश्वनिर्मलचे ५० शिबिरार्थी सहभागी झाले होते. इंडियन इन्स्टिट्यूट सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च, आगरकर रिसर्च इन्स्टिट्यूट, आबासाहेब गरवारे कॉलेज, मॉडर्न कॉलेज पुणे, अहमदनगर व वाय. सी. कॉलेज सातारा येथील १५ तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना निसर्गातील सजीव प्रजातीचे निरीक्षण, संवर्धनाविषयी मार्गदर्शन करून कडेपठार डोंगर, होळकर तलाव व साकुर्डे परिसरातील पक्षी, प्राणी, कीटक आदी घटकांबाबत प्रत्यक्ष भेट देऊन माहिती दिली.

डॉ. अविनाश वंजारे, डॉ. युगंधर शिंदे, तसेच पीएचडीचे विद्यार्थी-समीर पाध्ये, श्रुती पत्तेदार, सायली शेठ, निखील मोडक, अबोली कुलकर्णी, सिद्धार्थ कुलकर्णी, सिद्धार्थ बिनीवाले, अनिकेत मराठे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पर्यावरणविषयी ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये प्रेम निर्माण व्हावे, प्रत्यक्ष निरीक्षणातून मुलांमध्ये संशोधक वृत्ती निर्माण व्हावी, यासाठी हा उपक्रम राबवणार असल्याचे चंद्रकांत एडिकन यांनी सांगितले.

प्राचार्य पेट्रिक एडिकन, प्रज्ञा रेडीकन, रेश्मा पानसरे, अर्चना लोखंडे आदींनी या कार्यशाळेचे नियोजन केले. समारोपप्रसंगी नगराध्यक्ष अविनाश भालेराव, नगरसेविका साधना दीडभाई, सुरेखा सोनवणे, ज्ञानेश्वरी बारभाई यांनी उपक्रमाचे कौतुक केले.



**जेजुरी (ता. पुरंदर) : पर्यावरण संवर्धन विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना चंद्रकांत एडिकन. व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.**